# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail – dy.registrar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Qaulity Assurance (AAQA)
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

एएक्युए/आयसीडी/२०२५–२०२६/४२

परिपत्रक:–

विषय:– राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) यांपैकी कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्याकरीता विकल्प सादर करण्याबाबत...

संदर्भ:– १) या विभागाचे क्र.एएक्युए/आयसीडी/२०२४–२५/२१०१, दिनांक १९ मार्च, २०२५ रोजीचे परिपत्रक

२) क्र.सेनिवे–प्र.क्र.५४/सेवा–४, दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीचे शासन निर्णय

मुंबई विद्यापीठाच्या विविध अनुदानित विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, उपकेंद्र, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांच्या अधिपत्याखालील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन अनुदानित पदावर नियुक्त झालेल्या सर्व स्थायी शिक्षकांना संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकाप्रमाणे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत विकल्प देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र.२ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये सदर विकल्प सादर करण्याकरीता १ वर्ष म्हणजेच ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठातील सर्व संबंधित शिक्षकांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या शिक्षकांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी विकल्प सादर करण्याकरीता १ वर्ष म्हणजेच ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची नोंद घ्यावी.

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

मुंबई ४०० ०३२
दिनांक : ९ एप्रिल, २०२५

प्रति,

विद्यापीठाच्या विविध अनुदानित विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, उपकेंद्र, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना माहितीकरीता रवाना.

१) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक
२) मा. प्र–कुलगुरूंचे स्वीय सहायक
३) मा. कुलसचिवाचे स्वीय सहायक

AAQA/Rupali/Circular